स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१


रासेयो/२०२२–२३/९४३ **तातडीचे व अतिमहत्त्वाचे** दि. ०८/०२/२०२३

**प्रति,**
**मा. प्राचार्य/संचालक/कार्यक्रम अधिकारी**
**रासेयो संलग्नित महाविद्यालये व परिसंस्था**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
**पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा**

विषय : रासेयो महाविद्यालय स्तरावर (Zero Balance Subsidiary Account Current Account) चालू खाते S.B.I. च्या नजीकच्या शाखेत उघडण्याबाबत दिनांक ९.२.२०२३ रोजी आढावा बैठक

संदर्भ : १. रासेयो/२०२२–२३/९०७, दिनांक : ०९/०१/२०२३ रोजीचे परिपत्रक
(लिंकः http://collegecirculars.unipune.ac.in/sites/documents/NSS%20Circulars/C.N.A.Final%20Circular_c_19012023.pdf)
२. रासेयो–२०२२/प्र.क्र.१५५/साशि–७, दि.०८/०२/२०२३ उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे पत्र
३. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे अ.शा.पत्र.क्र.रासेयो–२०२२/प्र.क्र.१५५/साशि–७, दिनांक ७ फेब्रुवारी, २०२३ चे पत्र

**महोदय/महोदया,**

वरील संदर्भीय पत्रान्वये मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या प्रमुख उपस्थितीत महाविद्यालय स्तरावर (Zero Balance Subsidiary Account Current Account) चालू खाते S.B.I. च्या नजीकच्या शाखेत उघडण्याबाबत विलंबाने होत असलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने दिनांक ९.२.२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजता आढावा बैठकीचे आयोजन दुरदृश्यप्रणालीद्वारे करण्यात आलेले आहे.

सदर आढावा नियोजन बैठकीकरिता पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यातील रासेयो संलग्न शासन अनुदानीत एकक (स्वयंनिर्वाही एकक वगळून) असणाऱ्या सर्व महाविद्यालयातील मा. प्राचार्य व एकक निहाय सर्व कार्यक्रम अधिकारी यांनी पुढील युट्यूब व फेसबुक लिंकद्वारे उपस्थित रहाणे अनिवार्य आहे. कळावे, ही विनंती.

| माध्यम | फेसबुक लाईव्ह व युट्यूब लिंकद्वारे मा. प्राचार्य व कार्यक्रम अधिकारी यांनी सहभागी व्हावे. |
|---|---|
| f LIVE | https://www.facebook.com/SPPUNSS |
| YouTube | https://www.youtube.com/@sppunss7757 |
| zoom | जिल्हा समन्वयक, रासेयो पुणे, अहमदनगर व नाशिक यांनी झूम लिंकद्वारे प्रत्यक्ष बैठकीस उपस्थित राहणे आवश्यक आहे. याकरिताची स्वंतत्र लिंक आपणास पत्राद्वारे पाठवण्यात आली आहे. |

**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**

महाराष्ट्र शासन

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक : रासेयो-२०२२/प्र.क्र.१५५/साशि-७
उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय कक्ष,
एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर,
३, महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई-१.
Email: nssmantralaya@gmail.com
दिनांक :- ८ फेब्रुवारी, २०२३.

<u>आढावा बैठक (दूरदृश्यप्रणाली द्वारे)</u>
दि. ९.२.२०२३ रोजी दुपारी ३:०० वा.

प्रति,
कार्यक्रम समन्वयक/संचालक
राष्ट्रीय सेवा योजना,
सर्व अकृषि/कृषि/अभिमत विद्यापीठे/संस्था/+२ स्तर, महाराष्ट्र राज्य.

विषय :- **रासेयो विद्यापीठ तसेच महाविद्यालय स्तरावर Z.B.S.A.- Current Account खाते SBI च्या नजीकच्या शाखेमध्ये उघडणेबाबत दि.९.२.२०२३ रोजीची आढावा बैठक....**

संदर्भ :- मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील अ.शा.पत्र क्र. रासेयो-२०२२/प्र.क्र.१५५/साशि-७, दिनांक ७.२.२०२३.

मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील अ.शा.पत्र क्र. रासेयो-२०२२/ प्र.क्र.१५५/साशि-७, दिनांक ७.२.२०२३ अन्वये राज्यातील ३० शासन अनुदानीत विद्यापीठ व अधिनस्त रासेयो एकक महाविद्यालय स्तरावर रासेयो करीताचे Z.B.S.A.- Current Account खाते SBI च्या नजीकच्या शाखेमध्ये उघडणेबाबत विलंबाने होत कार्यवाहीच्या अनुषंगाने दि.९.२.२०२३ रोजी दुपारी ३:०० वाजता आढावा बैठक विभागाचे मा. प्रधान सचिव यांचे अध्यक्षतेखाली दूरदृश्यप्रणालीद्वारे आयोजीत केली आहे. सदर बैठकीमध्ये भारतीय स्टेट बँकेचे महाराष्ट्र नोडल अधिकारी हे Z.B.S.A.- Current Account खाते उघडणेसंबंधी येत असलेल्या अडचणींबाबत सविस्तर मार्गदर्शन करतील.

सदर बैठकीची झूम लिंक खालीलप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात येत असून या लिंकद्वारे मंत्रालयीन अधिकारी वर्ग, रासेयोचे कार्यक्रम समन्वयक तथा संचालक आणि जिल्हा समन्वयक हेच केवळ सहभागी होतील.

Join Zoom Meeting
https://us02web.zoom.us/j/82983515789?pwd=TGVDY3BEREE3TlNYZEVjaFpOSm1EUT09
[redacted]

याव्यतिरिक्त रासेयो एकक महाविद्यालयातील कार्यक्रम अधिकारी/प्राचार्य आणि विभागीय समन्वयक हे खाली दिलेल्या यूटयुब व फेसबुक लिंकद्वारे सदरील आढावा बैठकीस ऑनलाईन सहभागी व्हावे. एकही कार्यक्रम अधिकारी झूम लिंकद्वारे सहभागी होणार नाही, अशा स्पष्ट सूचना आपणामार्फत अधिनस्त रासेयो एकक महाविद्यालयांतील कार्यक्रम अधिकारी यांना तातडीने देण्यात याव्यात.

YouTube : https://www.youtube.com/@sppunss7757
Facebook : https://www.facebook.com/SPPUNSS
[redacted]

याद्वारे राज्यातील ३० शासन अनुदानीत विद्यापीठे/संचालनालयातील रासेयो कार्यक्रम समन्वयक तथा संचालक यांना सूचित करण्यात येते की, सदरील बैठकीच्या वेळी आपले विद्यापीठ व अधिनस्त रासेयो एकक महाविद्यालयाकडील Z.B.S.A.- Current Account खाते SBI च्या नजीकच्या शाखेमध्ये उघडणेबाबत केलेल्या कार्यवाहीचा अद्ययावत अहवालासह उक्त दिलेल्या झूम लिंकद्वारे उपस्थित राहतील. तसेच आपले अधिनस्त महाविद्यालयातील कार्यक्रम अधिकारी यांनी त्यांचेकरीता असलेल्या यूटयुब व फेसबुक लिंकद्वारे सहभागी होण्याच्या सूचना तातडीने देण्यात याव्यात.

Rameshwar
8-2-23

(डॉ. रामेश्वर कोठावळे)
राज्य संपर्क अधिकारी/वि.का.अ.
राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र राज्य.

प्रत माहितीस्तव सादर -

१. मा. प्रधान सचिव यांचे स्वीय सहायक,उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. क्षेत्रीय संचालक, रासेयो क्षेत्रीय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

विकास चंद्र रस्तोगी,
प्रधान सचिव.

अ.शा.पत्र क्र. रासेयो-२०२२/प्र.क्र.१५५/साशि-७,
दिनांक :- ७ फेब्रुवारी, २०२३.

विषय :- Central Nodal Account अंतर्गत रासेयोच्या निधी वितरणाकरीता विद्यापीठ तसेच अधिनस्त महाविद्यालयाचे State Bank of India मध्ये नजीकच्या शाखेत ZBSA-Current Account उघडणेची कार्यवाही तातडीने पूर्ण करणेबाबत...

प्रिय महोदय,

केंद्र हिस्सा योजने अंतर्गत Central Sector Scheme (CSS) राष्ट्रीय सेवा योजना सहायक अनुदान निधी वितरणाची अंमलबजावणी Central Nodal Account (CNA) मार्फत करणेसाठी युवा कार्य क्रीडा मंत्रालय, युवा कार्य विभाग, रासेयो कक्ष, भारत सरकार, नवी दिल्ली यांचेकडील दि. ६.१०.२०२२ रोजीच्या ई-मेल संदेशानुसार केंद्र हिस्सा योजना (CSS) असलेल्या देशातील प्रत्येक राज्याने CNA खाते State Bank of India मध्ये उघडण्याची कार्यवाही पूर्णकरणेबाबत नमूद केले आहे. त्यानुसार राज्याच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्षाकडून " राज्य संपर्क अधिकारी-विशेष कार्य अधिकारी, रासेयो, महाराष्ट्र" या नांवे भारतीय स्टेट बँकेच्या, पुणे मुख्य शाखा येथे ZBSA अंतर्गत बचत खाते (खाते क्रमांक - ४१३६५११०१७३ ) उघडण्यात आले आहे.

युवा कार्य व क्रीडा मंत्रालय,भारत सरकार यांचेकडील दि. २.१.२०२३ रोजीच्या ई-मेल संदेशान्वये रासेयो करीता राज्यातील प्रत्येक विद्यापीठ तसेच अधिनस्त महाविद्यालयाने देखील त्यांचे नजीकच्या भारतीय स्टेट बँकेच्या शाखेमध्ये ZBSA-Current Account उघडण्यात यावे, अशा सूचना देण्यात आल्या. त्यानुसार विभागाचे पत्र क्र. रासेयो-२०२२/प्र.क्र.१५५/साशि-७, दि.२.१.२०२३ अन्वये राज्यातील सर्व विद्यापीठे तसेच महाविद्यालये यांनी तातडीने त्यांचे नजीकच्या भारतीय स्टेट बँकेच्या शाखेमध्ये ZBSA-Current Account उघडण्याची कार्यवाही पूर्ण करावी असे सूचित करुन दि. ४.१.२०२३ च्या पत्रासोबत मार्गदर्शक सूचना, यासंबंधित आवश्यक ती सर्व कागदपत्रे,सहपत्रे, ई-मेल संदेश इत्यादी बाबी निर्गमित केल्या आहेत.

केंद्रीय मंत्रालयाकडून याबाबतीत दैनंदिन स्वरुपात सातत्याने आढावा घेतला असून राज्यातील शासन अनुदानीत विद्यार्थी संख्या मंजूर व वितरीत केलेले **३० विद्यापीठे व त्यांचे अधिनस्त असलेल्या एकूण २६६५ महाविद्यालयांपैकी केवळ १८ ते २० टक्के इतक्या अत्यल्प प्रमाणात नवीन खाते उघडण्याची कार्यवाही** पूर्ण झाल्याने नाराजी व्यक्त केली असून तातडीने सर्वच ठिकाणी नवीन खाते उघडण्यात येऊन PFMS प्रणालीमध्ये त्याचे mapping देखील करण्याची कार्यवाही पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

यास्तव आपलेमार्फत, आपले विद्यापीठाकडील राष्ट्रीय सेवा योजनेचे कामकाज पाहणाऱ्या कार्यक्रम समन्वयक तथा संचालक आणि अधिनस्त महाविद्यालयातील रासेयो कार्यक्रम अधिकारी व प्राचार्य यांना त्यांचे नजीकच्या भारतीय स्टेट बँकेच्या शाखेमध्ये ZBSA-Current Account उघडण्याची कार्यवाही तात्काळ पूर्ण करणेबाबत आदेशीत करावे. तसेच या अनुषंगाने राज्यातील सर्व विद्यापीठाच्या रासेयो कार्यक्रम समन्वयक तथा संचालक, जिल्हा समन्वयक, एरिया समन्वयक, कार्यक्रम अधिकारी व प्राचार्य यांचेकरीता दूरदृश्य प्रणालीमार्फत **दि. ९ फेब्रुवारी, २०२३ रोजी दुपारी ३:०० वाजता** बैठकीचे आयोजन केले असून त्यास उपस्थित रहाणेच्या सूचना निर्गमित करण्यात याव्यात, ही विनंती.

**(विकास चंद्र रस्तोगी)**

प्रति,

कुलगुरु, सर्व विद्यापीठे (रासेयो-शासन अनुदानीत), महाराष्ट्र राज्य.

प्रत माहितीस्तव - क्षेत्रीय संचालक, रासेयो संचालनालय, महाराष्ट्र व गोवा राज्य, पुणे.